# पुस्तिका - तीन

## निर्णय घेण्याच्या प्रक्रीयेमध्ये अवलंबिण्यात येणारी पध्दत -

3.1. विविध प्रकरणी निर्णय घेण्याकरिता कोणती कार्यपध्दती अवलंबिण्यात येते ?

महानगरपालिका सचिव आणि त्यांचे सहकारी, अधिकारी व कर्मचारी महापालिका आणि तिच्या विविध समित्यांच्या सभा आयोजित करतात. महानगरपालिका सचिव आणि त्यांचे सहकारी, अधिकारी महानगरपालिका आणि तिच्या विविध वैधानिक समित्यांच्या व विशेष समित्यांच्या सभांना उपस्थित राहतात आणि माननीय महापौर आणि संबंधित समित्यांच्या अध्यक्षांना निर्णय घेण्याकरिता मार्गदर्शन करतात. अद्ययावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ आणि महानगरपालिका कार्यपध्दतिविषयक नियम आणि विनियम हयांनुसार सभा घेण्यात येऊन त्यांचे कामकाज चालविण्यात येते.

3.2. महत्वाच्या प्रकरणी विशिष्ट निर्णय घेण्याकरिता कोणते कार्यपध्दतिविषयक दस्तऐवज/प्रचलित कार्यपध्दती/निश्चित केलेले निकष/नियम असतात? निर्णय प्रकिया कोणकोणत्या निरनिराळ्या पातळीवर चालते ?

अद्ययावत् सुधारीत मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८, महानगरपालिका कार्यपध्दतीविषयक नियम व विनियम, सभाविषयक पुस्तिका, महापौरांचे निर्णय, सभांची परंपरा आणि महानगरपालिका आणि तिच्या विविध समित्यांच्या सभांमध्ये अवलंबिलेल्या / घडलेल्या विविध कार्यपध्दती.

3.3. घेतलेले निर्णय जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी कोणती व्यवस्था करण्यात येते ?

महानगरपालिका आणि तिच्या विविध समित्यांचे सभावृत्तांत नगरसेवकांना मोफत आणि जनतेला अधिनियमात विहित केलेले नाममात्र शुल्क आकारुन पाहणीकरिता उपलब्ध करुन देण्यात येतात.

3.4. निर्णय घेण्याच्या प्रक्रीयेत कोणकोणत्या अधिकाऱ्यांची विविध पातळीवर मते मागविण्यात येतात ?

आवश्यकता भासल्यास, मुंबई महानगरपालिकेचे कायदा अधिकारी व महानगरपालिका आयुक्तांनी नियुक्त केलेले विधिज्ञ हयांनी दिलेली कायदेशीर मते आणि राज्य शासनाचे महाधिवक्ता हयांची मते, निर्णय घेण्याच्या प्रक्रीयेसाठी मागविण्यात येतात.

3.5. निर्णय देणारे अंतिम प्राधिकारी कोण असतात ?

महानगरपालिका आणि तिच्या विविध समित्या अंतिम निर्णय घेतात, तथापि, महानगरपालिका आणि तिच्या विविध समित्यांच्या सभांमध्ये मंजूर झालेल्या ठरावांचा मसुदा आणि सभावृत्तांत महानगरपालिका सचिव अंतिम करतात.

3.6. महत्वाच्या प्रकरणी सार्वजनिक प्राधिकरणांनी घेतलेल्या निर्णयाची माहिती पुढीलप्रमाणे नमुन्यामध्ये स्वतंत्ररित्या कृपया उपलब्ध करुन देण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| 1 | ज्यावर निर्णय घ्यावयाचा आहे, तो विषय | खासदार, आमदार, महानगरपालिका नगरसेवक आणि नागरिक हयांची पत्रे |
| 2 | मार्गदर्शक/दिशादर्शक, असल्यास | अ)अद्ययावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या तरतुदींनुसार,<br>ब)महानगरपालिका कार्यपध्दतिविषयक नियम व विनियम. |
| 3 | प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याची कार्यपध्दती | महानगरपालिका आणि तिच्या विविध समित्यांच्या सभांमध्ये घेतलेले निर्णय त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यासाठी महानगरपालिका आयुक्तांकडे पाठविणे. |
| 4 | निर्णय प्रक्रीयेत सहभागी होणाऱ्या अधिकाऱ्यांचे पदनाम. | महानगरपालिका सचिव. |
| 5 | उपरोक्त नमूद केलेल्या अधिकाऱ्यांच्या संपर्काबाबत माहिती | महानगरपालिका सचिव कार्यालय, नवीन विस्तारित इमारत, बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्य कार्यालय, महानगरपालिका मार्ग, मुंबई-४०० ००१ |
| 6 | निर्णयामुळे समाधानी नसल्यास आव्हान याचिका केव्हा व कुठे करावी ? | न्यायालयात जनहित याचिका दाखल करावी. |